## नियमित दिवाणी दावा क्र. १५/२०१९
## निशाणी क्र. ५७ वरील आदेश

( पारित दि.१२/१२/२०२३)

वादीने प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी क्र.४ श्रीमती मालती मधुकर दांडेकर यांचे वारस अभिलेखावर घेण्याकरीता झालेला विलंब माफ करुन मिळणेसाठी आणि अबेटमेंटचा आदेश रद्द करुन मिळणेसाठी दाखल केला आहे. वादीच्या म्हणण्यानुसार, प्रतिवादी क्र.०४ श्रीमती मालती मधुकर दांडेकर या दि. २३/०२/२०१९ रोजी मयत झाल्या आहेत. वादीस मृत्युचा दाखला वेळेत मिळाला नाही आणि वारसांची आवश्यक ती माहिती वेळेत न मिळाल्यामुळे वारसांची पुर्तता वेळेत करता आली नाही. म्हणून प्रतिवादीचे वारस अभिलेखावर घेण्यास झालेला विलंब माफ करुन अबेटमेंटचा आदेश रद्द करुन प्रतिवादी क्र.४ यांचे वारसांना अभिलेखावर घेण्यात यावेत अशी वादीची मागणी आहे.

०२. प्रतिवादीने वादीच्या अर्जास म्हणणे देवून हरकत नोंदवली आहे.

०३. दोन्ही बाजुंचे म्हणणे ऐकले. अभिलेखाचे अवलोकन केले. अर्जाला प्रतिज्ञाद्वारे आधार दिला जातो. अर्जाच्या पुष्टयर्थ अर्जदार गजेंद्र पटेल याने प्रतिज्ञापत्र दाखल केले आहे. मृत्युच्या दाखल्याची प्रत नि. क्र. ५२ लगत दाखल केलेली आहे. त्याप्रमाणे प्रतिवादी क्र. ४ श्रीमती मालती मधुकर दांडेकर हया दि. २३/०२/२०१९ रोजी मयत झाल्याचे अभिलेखावर दिसून येते. वास्तविक पाहता, प्रतिवादीचे कायदेशीर वारस अभिलेखावर घेण्यासाठी ९० दिवसांच्या आत अर्ज दाखल करावा लागतो.

निश्चितच अर्ज विलंबाने दाखल केलेला आहे. परंतु सदरचा दावा हा स्थावर मिळकतीबाबत असल्याने दाव्याचा गुणदोषावर न्यायनिर्णय करण्याकरीता प्रतिवादी क्र.०४ चे कायदेशीर प्रतिनिधी अभिलेखावर घेण्यासाठी झालेला विलंब माफ करुन अबेटमेंटचा (Abatement) आदेश रद्द करणे आवश्यक आहे. अर्ज दाखल करण्यास झालेल्या विलंबाबाबत वादीवर अर्जाचा खर्च ठेवणे योग्य होईल. सबब, मी पुढील आदेश पारीत करत आहे. सबब,

## आदेश

०१. अर्ज (नि. क्र. ५७) रक्कम रु. १,०००/- च्या खर्चासह मंजूर करण्यात येत आहे. खर्चाची रक्कम सरकार जमा करण्यात यावी.

०२. प्रतिवादी क्र.०४ चे कायदेशीर वारस अभिलेखावर घेण्यासाठी झालेला विलंब माफ करुन अबेटमेंटचा (Abatement) आदेश रद्द करण्यात येत आहे.

(खुल्या न्यायालयात जाहीर करण्यात आला )

सही/-

**ठिकाणः पाली** **(मिना वामन जाधव)**

**दिनांक : १२/१२/२०२३** **दिवाणी न्यायाधीश क. स्तर, पाली.**